**<u>नियमित दरखास्त क्र. ०१/२०१८ मध्ये निशाण ४१ वरील आदेश</u>**

सामनेवाला क्र. १ ते ४ यांनी प्रस्तुत अर्ज याकामी दाखल असलेल्या खरेदीखतामध्ये 'मुद्दा क्र. १ मिळकतीचे स्वरूप– बिनशेती' या ऐवजी '१ मिळकतीचे स्वरूप– शेतजमिन' अशा मजकूर दुरूस्तीसाठी दाखल केला आहे.

**०२.** दरखास्तदाराने त्याचे म्हणणे देताना 'योग्य तो आदेश करण्यात यावा' असे म्हणणे दिले आहे.

**०३.** दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणातील खरेदीखतामध्ये मागण्यात आलेली दुरूस्ती याबद्दल दरखास्तदाराने कोणताही आक्षेप नोंदविलेला नाही. सदर दुरूस्तीचे स्वरूप बघता खरेदीखताचे मसुद्यामध्ये कोणताही बदल होणार नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :–

**<u>आदेश</u>**

१. सामनेवाला क्र. १ ते ४ यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जात विनंती केल्यानुसार दरखास्तदाराने पुढील तारखेस अगर तत्पुर्वी विनंती करण्यात आलेली दुरुस्ती या प्रकरणातील खरेदीखतातील मसुद्यामध्ये करावी व त्याप्रमाणे दुरूस्त खरेदीखत मसुदा याकामी दाखल करावा.

JOSHI SNEHAL RAJAN

Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2025.07.08 17:52:39 +0530

**दिनांक ०८/०७/२०२५** **(एस. आर. जोशी)**

**ठिकाण लांजा** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**

**लांजा,जि.रत्नागिरी**

| CERTIFICATE | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this pdf file Judgment/ Order are same word as per original Judgment. | | |
| Name of Stenographer | :- | S. D. Chavan |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Lanja |
| Date of decision | :- | 08/07/2025 |
| Order Signed by P.O. on | :- | 08/07/2025 |
| Order uploaded on | :- | 09/07/2025 |